# विनंती अर्ज

दिनांक :- २५/०७/२०२३

प्रति,

मा. नोडल अधिकारी,
विभागीय अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट प्रकल्प, जळगाव.

**विषय :-** जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पात काम करतांना मिळणाऱ्या मानधनातील तफावती बाबत..

**संदर्भ :-** १) T & M SERVICES CONSULTING PVT.LTD, MUMBAI मार्फत मिळालेले निवड आदेश
पत्र Ref.No.TNM/MH/ID-३३२०६२/२०२२-२०२३ दिनांक ०६/१२/२०२२.
२) अर्थतज्ञ तथा वित्तीय प्रवेश सल्लागार पद भरती करिता प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात दिनांक ०६/०७/२०२२.

मी नितीन राजीव इंगळे विनंतीपुर्वक अर्ज सादर करतो की, माझी निवड उपरोक्त संदर्भ १ नुसार, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत अर्थतज्ञ तथा वित्तीय प्रवेश सल्लागार या पदाकरीता जिल्हा अंमलबजावणी कक्ष, जळगाव येथे झालेली आहे.

अर्थतज्ञ तथा वित्तीय प्रवेश सल्लागार पद भरती करिता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये **रुपये ५००००/-**(अक्षरी रक्कम- पन्नास हजार रुपये फक्त) मानधन/वेतन दर्शविण्यात आलेले होते व त्यामुळेच सदरील पदाकरिता मी अर्ज सादर केला होता.

वरील पदाकरिता जाहिराती मध्ये नमूद असलेले मानधन/वेतन व मला नियुक्ती पत्रामध्ये देण्यात आलेले मानधन/वेतन रक्कम रुपये **२०७००/-** (अक्षरी रक्कम- वीस हजार सातशे रुपये फक्त) यामध्ये बरीच तफावत आहे. या पदाच्या कामाचे स्वरूप प्रकल्पातील सर्व विभागीय/जिल्हा अंमलबजावणी कक्षामध्ये एक सारखेच आहे.

त्यामुळे समान काम व समान मानधन/वेतन सर्व ठिकाणी एक सारखेच असायला हवे अशी माझी धारणा आहे.

D.I.U.(Smart),Jalgaon
Inward No. 278
Date: 25/07/2023

मी बुलडाणा जिल्ह्यातील रहिवासी असून माझी नियुक्ती जळगाव येथे असल्याने परिवारासह भाड्याने रूम करून राहत असून माझे राहणे,रूम भाडे,जेवणाचा व येणे जाने चा खर्च आपण दिलेल्या मानधन पुरेसे नसून सध्याच्या महागाईचा दर लक्षात घेऊन जळगाव सारख्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुख्यालयी कुंटुबासमवेत वास्तव्यास असल्याने मला जाहिरातील माझ्या पदाला मंजूर असलेले मानधन/वेतन मिळायला हवे. शासनाकडे झालेली सेवा लक्षात घेता तसेच माझ्या सारख्या पात्र व अनुभवी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचा उपजिविकेचा सहानुभूतीपूर्वक विचार करून मनोबल वाढावे व मनाचे खच्चीकरण न होता माझ्या अर्जाचा सहानुतीपूर्वक विचार करून माझ्या पदाला स्मार्ट प्रकल्पात जाहीरातीमध्ये नमुद केलेले वेतन/मानधन मिळावे ही नम्र विनंती.

आपला विश्वासु

(नितीन राजीव इंगळे)
अर्थतज्ञ तथा वित्तीय प्रवेश सल्लागार,
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट प्रकल्प, जळगाव .

<u>प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर :-</u>

1) मा. प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.
2) मा.वित्त विशेषज्ञ,प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.
3) मा. प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(कृषि), स्मार्ट प्रकल्प, पुणे.
4) मा. विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
5) मा. H.R., T & M Services Consulting Private Limited, Dahisar (East.) Mumbai - ४०००६८, (SMART).